35


# महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ

कल्पतरु पाईंट इमारत, २ रा मजला,
सिने प्लॅनेट सिनेमासमोर, सायन-माटुंगा
स्किम रोड नं.८, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२


जा.क्र.:मप्रनि/विधी व योजना विभाग/ब- 3790 दिनांक : १८/०६/२०११

11_06281-T0188

## परिपत्रक

विषय : राज्य शासनाचा पर्यावरण अनुमतीबाबतचा दिनांक ७/८/१९९७ चा शासन निर्णय रद्द करण्याबाबत

संदर्भ : पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्र.इएनव्ही २०१०/प्र.क्र.२४६/तां.क.२, दि.२६/५/२०११

---------

उप-सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी राज्य शासनाचा पर्यावरण अनुमतीबाबतचा दिनांक ७/८/१९९७ चा शासन निर्णय रद्द करण्याबाबत पारीत केलेला दिनांक २६/५/२०११ चा शासन निर्णय आपल्या माहितीसाठी व योग्य त्या अंमलबजावणीसाठी सोबत जोडण्यात येत आहे.

( द. त्रि. देवळे )
वरिष्ठ विधी अधिकारी

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर : सदस्य सचिव, मप्रनि मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. सह-संचालक(जल प्रदूषण नियंत्रण)/सह संचालक (हवा प्रदूषण नियंत्रण)/प्रधान वैज्ञानिक अधिकारी(PCI-I)/सह-संचालक(तांत्रिक)/मुख्य लेखा अधिकारी/प्रादेशिक अधिकारी(प्रकल्प व योजना)/सह-संचालक(पॅम्स)/प्रोजेक्ट लिडर(झोनिंग ॲटलास), मप्रनि मंडळ, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांना याबाबत अवगत करावे
२. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी(मध्यवर्ती प्रयोगशाळा,महापे)/सांख्यिकी अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई- त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांना याबाबत अवगत करावे
३. विधी अधिकारी (श्री भुरे)/विधी अधिकारी (श्री पुरकर), मप्रनि मंडळ, मुंबई.
४. प्रादेशिक अधिकारी -(PCI-II)/घातक घनकचरा व्यवस्थापन (मुख्यालय)/प्रकल्प व योजना/समन्वय/मुख्यालय/पॅम्स/प्रदूषण नियंत्रण अधिकारी विभाग-२ (PCI-I)/मुंबई/नवी मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर, मप्रनि मंडळ. त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांना याबाबत अवगत करावे
५. सर्व साहाय्यक विधी अधिकारी, विधी व योजना विभाग, मप्रनि मंडळ, मुंबई.
६. असिस्टंट सिस्टिम ऑफिसर,संकेतस्थळ विभाग,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ -त्यांनी सदर शासन निर्णयाची प्रत मप्रनि मंडळाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात यावी

राज्य शासनाचा पर्यावरण
अनुमतीबाबतचा दिनांक ७/०८/१९९७
चा शासन निर्णय रद्द करण्याबाबत......

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र. इएनव्ही २०१०/प्र.क्र. २४६/तां.क. २
मंत्रालय, मुंबई ३२
दिनांक : २६ मे, २०११

वाचा : १) शासन निर्णय क्र. इएनव्ही १०९४/एसइएसी/सी आर १७०/ डेस्क १ दिनांक ७ ऑगस्ट, १९९७.
२) शासन पूरक पत्र क्र. इएनव्ही १०९४/एसइएसी/सी आर १७०/ डेस्क १ दिनांक ३ जून, २०००.
३) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची अधिसूचना क्र. एस.ओ. १५३३ दिनांक १४ सप्टेंबर, २००६.

**प्रस्तावना:**

केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक १५/०९/२००६ च्या अधिसूचनेन्वये दि. २७/०१/१९९४ ची पर्यावरण मुल्यांकन आघात अधिसूचना व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा अधिक्रमीत करुन सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ पारित करण्यात आलेली आहे. राज्य शासनाच्या पर्यावरण अनुमती बाबतच्या दि. ७/०४/१९९७ मधील बहुतांश प्रकल्पांचा केंद्र शासनाच्या सुधारित पर्यावरण मुल्यांकन अधिसूचना, २००६ मध्ये समावेष असल्याने तसेच सदरचा शासन निर्णय हा केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक २७/०१/१९९४ च्या अधिसूचनेवर आधारित असल्याने सदर शासन निर्णय व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांबाबतचे आदेश रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाने त्यांच्या दिनांक १५/०९/२००६ च्या अधिसूचनेन्वये सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ पारित केलेली असल्याने, केंद्र शासनाच्या यापूर्वीच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, १९९४ वर आधारित असलेला राज्य शासनाचा संदर्भाधीन दिनांक ७/०८/१९९७ चा शासन निर्णय व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांबाबतचे आदेश या शासन निर्णयाव्दारे रद्द करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०११०५२६१४३८०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(ज्ञा. ज. भारती)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव